# विनीता साहू, यांचा पोलीस अधीक्षक भंडारा पदावरील एक वर्षाचा यशस्वी कालावधी पुर्ण

श्रीमती विनीता साहू, भापोसे सद्या पोलीस अधीक्षक भंडारा यांची ऑगष्ट २०१० मधे भारतीय पोलीस दलात, केंद्रीय लोकसेवा आयोगातर्फे निवड करण्यात येवुन त्या दिनांक १८ डिसेंबर २०१५ पासुन भंडारा जिल्हा पोलीस अधीक्षक पदावर कार्यरत आहेत. यापुर्वी त्यांनी पोलीस अधीक्षक वाशीम, अपर पोलीस अधीक्षक सिंधुदुर्ग, सहायक पोलीस अधीक्षक नांदेड, परीविक्षाधीन कालावधी ठाणे ग्रामीण येथे केलेले आहे.

श्रीमती विनीता साहू यांनी भंडारा जिल्हा पोलीस अधीक्षक पदाचा कार्यभार स्विकारल्यानंतर त्यांना भंडारा जिल्हयात अवैद्य धंदे मोठया प्रमाणात फोफावले असल्याचे त्यांचे निदर्शनास आले ज्यामधे प्रामुख्याने घरातील जुगार, सट्टापट्टी आणि अंमली पदार्थाच्या विळख्यात तरुण पिढी गुरफटली असल्याचे दिसुन आल्याने त्यांनी सर्व अवैद्य धंदयांविरुध्द धडक मोहीम राबविली व जिल्हयात सुरु असलेले सर्व प्रकारचे अवैद्य धंदयांवर आपल्या पथकांमार्फत धाडी घालुन आरोपीतांना जेरबंद केले. भंडारा पोलीस स्टेशन अभिलेखावरील कुख्यात गुन्हेगार विशाल राहाटे, गंगाधर वरकडे, रमेश हेडाऊ व सट्टाकिंग पप्पु ठकराल यांचे विरुध्द वारंवार कारवाही करुन घरातील जुगार व सट्टापट्टी व्यवसाय नियंत्रणात आणले.

भंडारा शहरातुन जाणाऱ्या राष्ट्रीय महामार्गावर वाहतुकीची मोठया प्रमाणात कोंडी होत असल्याचे दिसुन आल्यावर पोलीस अधीक्षक विनीता साहू यांनी भंडारा पोलीस दलाकडे उपलब्ध बॅरीकेट्सचा अत्यंत नियोजनबध्द वापर करुन शहरात मुख्य वाहतुकींच्या ठिकाणी बॅरीकेट्स लावुन शहरातील वाहतुक सुरळीत केली. त्यामुळे प्राणांतीक अपघातांचे प्रमाणात कमी झाले आहे.

पोलीस अधीक्षक विनीता साहू या कर्तव्यनिष्ठ असुन त्यांचे शिक्षण एम. ए. ( पब्लीक ॲडमिनिस्ट्रेशन ) असे झालेले असुन शिक्षणामुळे त्यांचा कुटुंबाशी जिव्हाळयाचा संपर्क येतो व त्यांच्या शैक्षणिक पार्श्वभूमिवर त्यांनी भंडारा पोलीस दलातील अधिनस्थ अधिकारी, कर्मचाऱ्यांच्या कुटुंबियांची काळजी घेतली याचा प्रत्यय त्यांच्या कामावरुन दिसुन येतो त्या नियमीत पणे पोलीस निवासस्थाची पाहणी करुन त्यात वास्तव्य करीत असलेल्या अधिकारी, कर्मचाऱ्यांचे कुटुंबियांना भेटुन आपुलकीने त्यांच्या अडीअडचणींची माहीती घेवुन असलेल्या अडीअडचणी स्वस्तरावर सोडविण्याचा प्रयत्न करीत असतात त्यांनी पोलीस कुटुंबियांकरीता योगा शिबीर, चुंबकीय उपचार शिबीर, आरोग्य तपासणी शिबीर, रक्तदान शिबीर, गुणवत्ताधारक पोलीस पाल्यांचा सत्कार, महिला दिनानिमीत्त "शक्ती" या स्वयंयेवी संस्थेच्या सहाय्याने सर्व महिला पोलीस अधिकारी, कर्मचारी व पोलीस कुटुंबीयाकरीता आरोग्य विषयी मार्गदर्शन शिबीर, दामीनी पथकाद्वारे शाळा, कॉलेजेस मध्ये महिला विषयक कायदयाबाबत कार्यशाळा असे अनेकाविध उपक्रम राबविलेले आहेत. पोलीस निवासस्थानातील शौचालयांचे तसेच निवासस्थान परीसरातील पार्कचे नुतणीकरण, जिल्हा मुख्यालयाचे ठिकाणी

असलेल्या “ चैतन्य ” विश्राम गृहाचे सौंदर्यीकरण केलेले आहे. तसेच पोलीसांचे पाल्यांकरीता स्पर्धापरीक्षेच्या तयारी व प्रशिक्षणासंबंधात योजना आखुन परीक्षा पुर्व क्लासेस करण्याचे योजीले आहे.

जिल्हयातील पोलीस स्टेशन मधे कार्यरत असलेल्या पोलीस अधिकारी कर्मचाऱ्यांच्या निवासस्थानाची सोय व्हावी यादृष्टीकोणातुन जिल्हयातील पोलीस स्टेशन करडी, आंधळगांव, मोहाडी, साकोली, लाखांदुर, पवनी, लाखनी, सिहोरा, वरठी, गोबरवाही, कारधा आणि पोलीस मुख्यालय याठिकाणी एकुण ९४ अधिकारी आणि ८८३ कर्मचाऱ्यांकरीता नविन निवासस्थान बांधकामाची तसेच पोलीस अधीक्षक कार्यालयाच्या नविन प्रशासकीय ईमारतीच्या बांधकामाची मंजुरी मिळविण्यात आली असुन संबंधीत एजेन्सी कडुन सर्व्हे सुरु करण्यात आलेले आहे. जिल्हयातील नवनिर्मीत पोलीस स्टेशन करडी, दिघोरी येथील पोलीस स्टेशनच्या प्रशासकीय ईमारत व पो. स्टे. दिघोरी येथील अधिकारी, कर्मचाऱ्यांचे निवासस्थान बांधकामाकरीता शासनाकडे प्रस्ताव सादर करण्यात आले असुन त्याची मंजुरी मिळविण्याकरीता पाठपुरावा करण्यात येत आहे.

भंडारा जिल्हयामधे पोलीस कर्मचाऱ्यांच्या पदोन्नतीचा प्रश्न बरेच वर्षापासुन प्रलंबित होता. पोलीस अधीक्षक विनीता साहू यांनी भंडारा जिल्हा पोलीस दलातील ६२ कर्मचाऱ्यांना वरच्या पदावर पदोन्नती देवुन त्यांना प्रोत्साहीत केलेले आहे. भंडारा जिल्हा पोलीस दलाचे आस्थापणेवर ३१ पोलीस शिपायी पदांकरीता पारदर्शी व निष्कलंकीत पदभर्ती घेतलेली आहे.

पोलीस अधीक्षक विनीता साहू यांनी भंडारा जिल्हयातील सर्व सामान्य जनतेला सायबर गुन्हेगारीची माहीती व्हावी या उद्देशाने पोलीस मुख्यालयाचे परेड ग्राऊंडवर ई-टेक एक्स्पोचे यशस्वी आयोजन, वाहन चोरीची तक्रार पोलीस स्टेशनला न जाता मोबाईल ॲपद्वारे करता यावी याकरीता आंतरराष्ट्रीय सिटीजन कॉप ( या ॲपला डिजीटल इंडीया अवार्ड प्रदान करण्यात येत आहे. ) मोबाईल ॲप लॉंचींग, ईतर तक्रारी करीता प्रतिसाद मोबाईल ॲप देशात सायबर गुन्हेगारीत प्रचंड प्रमाणात वाढ होवुन त्याचा फटका सामान्य जनतेला बसु लागल्याने अशा गुन्हयांवर त्वरीत आळा बसविण्याकरीता भंडारा जिल्हयात अत्याधुनिक सायबर लॅबचे कामकाज महाराष्ट्रात सर्वात उशीरा सुरु होऊन अवघ्या ०६ दिवसात परिपुर्ण करण्यात आले त्यामुळे सायबर गुन्हे उघडकीस आणण्याचे प्रमाण वाढलेले असुन भविष्यात सुध्दा या नाविन्यपुर्ण लॅब मुळे सायबर गुन्हयांवर निश्चित आळा बसेल असा त्यांना विश्वास असुन याकरीता वेगळया सायबर अन्वेषण पथकाची स्थापणा करण्यात आली आहे. तसेच जिल्हयातील बालाघाट (म. प्र.) आंतरराज्यीय सिमेवरुन होणाऱ्या अवैद्य धंदयांना आळा बसविण्याकरीता पोलीस स्टेशन सिहोरा अंतर्गत बपेरा येथे पोलीस चौकी सुरु करण्याची शासनाकडुन मंजुरी मिळवुन घेण्यात आली असुन तात्पुरत्या स्वरुपात चौकी सुरु करण्यात आली आहे.

पोलीस व जनता यांचे संबंध वृध्दींगत व्हावे याकरीता पोलीस अधीक्षक विनीता साहू या सातत्याने प्रयत्नशिल आहेत पोलीस व जनता यांचे संबंध सलोख्याचे राहावे आणि कायदा व सुव्यवस्था अबाधीत राहावा म्हणुन त्यांनी पुढाकार घेवुन जिल्हयात वेगवेगळया ठिकाणी जनजागुती मेळावे, जातीय सलोखा बैठका आयोजीत करुन जनतेशी थेट संवाद साधलेला आहे. त्या शाळा, महाविद्यालयीन विद्यार्थ्यांकरीता नेहमी प्रेरणादायी ठरलेल्या आहेत. त्यांनी भंडारा शहरातील व